# VIVEK TUTORIALS

IX (English)

(Final Examination)

Marathi-

DATE: 18-03-19

TIME: 3 hour

MARKS: 100


SEAT NO:

विभाग १ - गदय

Q.1 (अ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (गद्य)

1) 1. सूचनेप्रमाणे कृती करा. 2

i. चौकटी पूर्ण करा.




तरीही सखू आजीचा मृत्यू मला खोलवर जखम करून गेला. आपलं असं काही हरवलं, असं मला आजही वाटतंय. माझ्या जगण्यातलं एक शुभ्र-निरभ्र काही संपल अशी एक पोकळी वाढतेय. कोण सखू आजी? माझी कोण लागत होती ती? कोणीच नाही. ना माझ्या जातीची ना पातीची; पण तरीही ती माझ्या जवळची होती. रक्ताच्या माणसाइतकीच. सखू आजीचं वय वर्षे नव्वद. हातात काठी. वाकून कमान झालेलं शरीर. चेहरा सुरकुत्यांनी भरलेला. सखू आजी गल्लीतून जाताना कोणी सहज म्हटलं, ‘आजी, कुठं चाललीस?’ तर लगेच उत्तर ‘कुठं जातोय बाबा. म्हातारं माणूस. हाडं गेली वड्याला, बघा माज्या मड्याला.’ म्हातारी काय बोलते हे सगळ्यांना समजायचं असं नाही; पण प्रत्येक जण तिच्याशी बोलायचा प्रयत्न करतो. म्हातारी प्रत्येकाशी बोलते. मला सखू आजी नेहमीच एक कविता वाटते. ती कवितेत बोलते. कवितेत जगते. तिच्याइतकं प्रचंड भाषिक ज्ञान मला कोणाकडंच दिसलं नाही.

2) 1. चौकटी पूर्ण करा.

i.लेखकाला सखू आजी नेहमी काय वाटे ? - ☐ 1/2

ii. लेखकाच्या मते सखू आजीचे व्यक्तिमत्त्व विशेष - ☐ 1/2

iii. सखू आजी कवितेत - 1. .............. 2. .............. 1

3) 1. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. 1

i. शरीर - .............. ii. म्हातारा - ..............

2. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा.

i. <u>म्हातारी</u> <u>आजी</u> परवा वारली. 1


4) माझे मत :- 2

आजीकडून ऐकलेल्या गोष्टीत कोणते विशिष्ट ज्ञान तुम्हाला जाणवले ?

(आ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (गद्य)

1) 1. सूचनेप्रमाणे कृती करा. 2

i. चौकटी पूर्ण करा.




सखू आजी परवा वारली, ही गोष्टी कदाचित सांगण्याइतपत महत्त्वाची नसेल, कारण आपण कितीतरी मृत्यू रोज अनुभवत असतो. मग सखू आजी मरण पावली याला विशेष महत्त्व काय, असा प्रश्न कोणीही उपस्थित करू शकेल. याबाबत मला काहीही म्हणायचे नाही. तरीही सखू आजीचा मृत्यू मला खोलवर जखम करून गेला. आपलं असं काही हरवलं, असं मला आजही वाटतंय. माझ्या जगण्यातलं एक

शुभ्र-निरभ्र काही संपल अशी एक पोकळी वाढतेय. कोण सखू आजी? माझी कोण लागत होती ती? कोणीच नाही. ना माझ्या जातीची ना पातीची; पण तरीही ती माझ्या जवळची होती. रक्ताच्या माणसाइतकीच. सखू आजीचं वय वर्षे नव्वद. हातात काठी. वाकून कमान झालेलं शरीर. चेहरा सुरकुत्यांनी भरलेला. सखू आजी गल्लीतून जाताना कोणी सहज म्हटलं, 'आजी, कुठं चाललीस?' तर लगेच उत्तर 'कुठं जातोय बाबा. म्हातारं माणूस. हाडं गेली वड्याला, बघा माज्या मड्याला.'

2) 1. कोष्टक पूर्ण करा.

i. लेखकाला खोलवर जखम करून गेला - [ ] 1

ii. 1

सखू आजीच्या मृत्यूनंतर लेखकाच्या मनात निर्माण झालेले प्रश्न
- [ ]
- ना माझ्या जातीची ना पातीची
- [ ]

3) 1. खालील वाक्यातील काळ ओळखा. 1

i. सखू आजी नेहमी कविता बोलते.

ii. लेखकावर आजीच्या मृत्यूचा खोल परिणाम झाला.

2. खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा. 1

i. उपस्थित × .............. ii. मृत्यू × ..............

4) माझे मत :- 2

आपल्या आजीबाबतच्या आठवणी तुमच्या शब्दात लिहा.

(इ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

1) कृति पूर्ण करा. 2

1) या उता-यात आलेली घोषवाक्ये - अ) .............. ब) ..............

2) ही परावलंबी वृत्ती आहे. - अ) .............. ब) ..............

`काम करा काम, घाम गाळा घाम` हा विकासासाठी आवश्यक असलेला घोषमंत्र आहे. कामासाठी दुसऱ्याकडे बोट दाखवायचे आणि आराम स्वतःसाठी राखून ठेवायचा अशी पोशखी, आळशी, परावलंबी वृती अनेकांची दिसून येते. माणसातील चिकाटी, बिनचूकपणा, कष्टाळूपणा श्रमदानातून समजतो. कष्टकरी समाज राबत असतो आणि त्याच्या श्रमांवर अनेकजण मजेत राहतात. आधी काम आणि मग थोडासा आराम हे प्रत्येकाने स्वतःला बजावत मनापासून काम करायला हवे. श्रमदानाच्या वेळी बुध्दिजीवींना आपल्या उणिवा कळतात आणि श्रमजीवींचे महत्व कळते. `आराम हराम है` हे पंडितजीचे वाक्य लक्षात ठेऊन आळस झटकून, काम करा काम, घाम गाळा घाम असे म्हणत कामाला लागा

2) कोष्टक पूर्ण करा. 2

1) हे माणसाने स्वतःला बजावायला हवे - [ ]

2) श्रमदानाच्यावेळी बुद्धिजीवींना समजते ते - अ) .............. ब) ..............

3) आपल्याला काय म्हणत कामाला लागले पाहिजे - [ ]

3) अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द उता-यातून लिहा. 1

1) प्रगती - .............. 2) स्वभाव - ..............

ब) खालील वाक्यातील अव्यय ओळखून प्रकार लिहा. 1

1) समाज राबत असतो आणि प्रगती होत असते.

2) इमारतीतून सुरेश हळूहळू खाली आला.

4) स्वमत :- 2

आपल्या जीवनातील कष्टाचे महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा.

विभाग २ - पदय

Q.2 (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (पद्य)

1) पुढील घटनांचे कवयित्रीला अपेक्षित परिणाम लिहा- 2

| गोष्टी | परिणाम |
|---|---|
| 1. वीज चमकणे | ------ |
| 2. पावसाच्या सरी व्हाव्यात | ------ |

पुन्हा एकदा
चमकावी वीज
उतरावी खाली
भिनावी रक्तात
पेटावे स्थायू
करीत पुकार
पुन्हा एकवार

पुन्हा एकदा
घालीत पिंगा
पावसाच्या सरी
व्हाव्यात बेभान
कोसळाव्या खाली
मातीत माती
व्हावी एक...
पुसून टाकीत
भेदाभेद ...
पुन्हा एकवेळ ...

2) कृती कराः- 1

1. पावसाच्या सरी -

अ. येणार आहेत - ..............

ब. होणार आहेत - ..............

2. खालील शब्दांचे कवितेतील समानार्थी शब्द लिहा.

अ) विद्युत - [ ] ब) जल्लोष - [ ] 1

3) आशय स्पष्ट करा. 2

"पुन्हा एकदा चमकावी वीज
उतरावी खाली भिनावी रक्तात"

4) स्वमत :- 2

कवितेचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

(आ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (पद्य)

1) i. कृती करा -

युवक भारल्यामुळे विसरणार आहे - 1

अ) .............. ब) ..............

ii. चौकट पूर्ण करा.

युवकाला याची चाहूल लागणार आहे - [ ] 1

पुन्हा एकदा
घुमावा वारा
युवक इथला
भारला जावा
भुलावी तहान
विसरावी भूक
नवनिर्माणाची
लागावी चाहूल
उजळावी भूमी ...

दिगंतात ...
पुन्हा एकदा ...

2) कवितेतील खालील घटना क्रमांकानूसार लिहा. 2

1. नवनिर्माणाची चाहूल लागावी.
2. तहान - भूक लागावी.
3. भूमी उजळावी.
4. युवक भारला जावा.

3) खालील पद्यपंक्तीचा संदर्भासहित स्पष्टीकरण करा - 2

"घुमावा वारा युवक इथला
भारला जावा भुलावी
तहान विसरावी भूक"

4) स्वमत :- 2

समाजात / देशात तुम्ही कोणते बदल आणाल हे तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) प्रस्तुत कवितेचे पुढील कृतिनिहाय रसग्रहण करा (4)

खालील ओळींचे रसग्रहण करा.
स्वागत करण्या वसंत ऋतूचे
रंग उधळले दिशा - दिशांना,
बेरड कोरड इथली सृष्टी
घेऊन आली ती नजराणा।।१।।

विभाग ३ - पूरक पठन

Q.3 स्थूलवाचन (6)

1) खालील पैकी कोणतीही एक कृती सोडवा. 6

1. 'काझीरंगा' ही कर्दमभूमी आहे हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.
   i. चिखलाची भूमी :
   ii. वनप्रदेश :
   iii. हत्ती हेच वाहन :
2. टिपा लिहा :
   i. वैजयंती :
   ii. गाय बगळे :
3. 'प्राण्याचे गंधज्ञान' या संकल्पनेबाबत तुमचे मत लिहा.

विभाग ४ - भाषा अध्यन (व्याकरण)

Q.4 (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.

1. समास - (2)

सामासिक शब्दांचा विग्रह करून समासाचे प्रकार लिहाः-

खालील तक्ता पूर्ण करा.

| अ. क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | मीठ भाकरी | ............. | ............. |
| 2. | बरेवाईट | ............. | ............. |

2. अलंकार - (2)

खालील उदाहरण वाचून कृती करा.

अत्रीच्या आश्रमीं । नेलें मज वाटें । माहेरची वाटें । खरेखुरें ।

| उपमेय | उपमान | समान धर्म | अलंकार |
|---|---|---|---|
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| .............. | .............. | .............. | .............. |

3. विभक्ती प्रत्यय ओळखून त्याचे प्रकार लिहा. (2)

विभक्ती / सामान्यरूप

i गोपूने ढोलीत हात घातला.

ii. म्हणजे माणसांनी माणसांची चोरी केली.

4. सामान्य रूप लिहाः- (2)

1) i. भूमी - ................

ii. नियम - ................

2) बोरघाट - ..............

5. आधोरेखांकित शब्दांविषयी खालील माहिती भरून तक्ता पूर्ण कराः- (2)

वाक्यः- पुरूषांसाठी व स्त्रियांसाठी वेगवेगळे सामने होतात.

| अ. क्र | शब्द | मूळशब्द | शब्दजात | प्रकार | लिंग | वचन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | स्त्रियांसाठी | .............. | .............. | .............. | .............. | .............. |
| 2. | वेगवेगळे | .............. | .............. | .............. | .............. | .............. |

(आ) भाषासौंदर्य

1. शब्दसंपत्ती -

(i) विरूद्धार्थी शब्द लिहा. (2)

निर्णित × ..............

दोष × ..............

गर्द × ..............

अध्ययन × ..............

(ii) खालील वाक्यांचे काळ ओळखा (2)

1) प्रवासी बंगला तेथून जवळच होता.

2) हा निसर्गातील आनंद त्यांच्या मनात कधी पोचल्याचं मी पाहिलंच नाही.

2. लेखननियमांनुसार (2)

खालील गटातील लेखननियमांनुसार योग्य शब्द लिहा.

1) पारंपारिक, पारंपरिक, पारंपारीक, पारंपरीक

2) क्रिडांगण, क्रीडांगण, क्रिंडागण, क्रिडांगन

3. विरामचिन्हे (2)

खालील वाक्यात विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहाः-

1) आपण कुठं असता कामाला ?

2) कबूल उद्यापासून मी येतो.

4. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द वाचा व वाक्ये लिंग बदलून लिहा. (1)

ऑलिंपिक सामन्यात स्त्रियांसाठी वेगवेगळे सामने होतात.

5. खालील वाक्यांतील सर्वनामे ओळखा. (1)

दुस-या दिवशी तो अगदी वेळेवर आला.

विभाग ५ - उपयोजित लेखन

Q.5 (अ) 1. खालील विषयावर पत्र लिहा. (5)

अमरावतीकरांना सुवर्णसंधी

' सरगम ' संस्था अमरावतीद्वारे आयोजित

**' दिवाळी पहाट '**

स्थळ - वसंतराव देशपांडे हॉल

कौस्तुभ व सोनाली माडे यांच्या

सुरेल, बहारदार गायनाचा कार्यक्रम

सर्व नागरिकांना

सर्वांनी सहभागी व्हा

तृप्त करा कानांना

प्रफुल्लित करा मनाला

सोमवार दिनांक 2 नोव्हेंबर

पहाटे 5.30 वाजता

घरपोच तिकिटांची सोय व हॉलवर विक्री सुरू.

रसिक नागरिक या नात्याने

कार्यक्रमाची तिकिटे संपल्यामुळे हाच कार्यक्रम पुन्हा सादर करण्याची मागणी करणारे पत्र लिहा.

घरपोच तिकिटे मागितल्याप्रमाणे न मिळाल्याबाबत संबंधित व्यक्तिकडे तक्रार करा.

2. विभाग १ - गदय प्रं.१(इ) उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा : (5)

(आ) खालील कृति करा

1. खालील जाहिरात वाचून त्याखालील कृती करा (6)

नाट्यसंस्कार कला अकादमी, पुणे प्रस्तुत

गंगोत्री ग्रीनबिल्ड आयोजित

मौज मस्ती धमाल बालनाट्य

शुक्रवार दि. 13 मे, संध्या. ५ वा.

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कराड, जि. सातारा

भित्रा राजपुत्र
लेखक : प्रकाश जाधव
दिग्दर्शक : मंगेश शेटे

मोठे झाले छोटे
लेखक : प्रदीप मोरे
दिग्दर्शक : शैलेश जगदाळे

मुले चोर पकडतात
लेखक : गंगाधर गाडगीळ
दिग्दर्शक : जयंती देव

कलाकार : सुबोध भट सह नाट्यसंस्कारचे माजी कलाकार

शिल्लक तिकीट विक्री हॉलवर दि.११ मे पासून स. ९ ते ११ सायं : ५.३० ते ७

कृती सोडवा

1 i. बालनाटयांची आयोजक संस्था - 1

ii. या नाटकांतील मुख्य कलाकार - 1

या नाटकांपैकी दिग्दर्शिकेने केलेले नाटक - 1

2वरील जाहिरात आधिक आकर्षक बनवण्यासाठी तुम्ही कोणकोणते बद्दल सुचवाल 2

2. खालील अपूर्ण कथा पुर्ण करुन लिहा. (6)


खालील अपूर्ण कथा वाचा. तुमच्या विचार व कल्पनेने कथा पूर्ण करा.
तुम्ही लिहिलेल्या अपूर्ण कथेला शीर्षक द्या व तात्पर्य लिहा.

कुरणगावात घडलेली ही कथा. गजधर नावाचा मुलगा आईवडिलांना कामात मदत करत असे. शेती करण्यासाठी सुद्धा मदत करी. शेतीला जोडव्यवसाय म्हणून बकाऱ्यांना राखण्याचे काम ते कुटुंब करत असे. त्यांच्याकडे जवळजवळ शंभर बकऱ्या व बकरे होते. त्यांना चरण्यासाठी दूरदूरच्या डोंगरावर तो नेत असे. मुलगा मेहनती होता पण त्याच्यातील अल्लडपणा अजून गेला नव्हता. चेष्टा-मस्करी करण्याची त्याला सवय होती. जवळच काही शेत होते. तेथे शेतकरी आपल्या शेतात काम करत होते. गजधरने एके दिवशी त्यांची गंमत करायचे ठरवले. गजधर अचानक `लांडगा आला रे लांडगा आला रे असे ओरडायला लागला. शेतकरी त्याच्या मदतीला धावत आले. पण तेथे लांडगा नव्हता. गजधर टाळ्या वाजवून मोठमोठयाने हसू लागला. शेतकरी परत गेले. असे शेतक-यांना फसवले, त्याने असे अनेकवेळा केले. शेतकरी प्रत्येक वेळी मदत करण्यासाठी यायाचे आणि हिरमुसले होऊन जायचे.

(इ) लेखनकौशल्य (8)

खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.

1) वृक्षाचे आत्मवृत्त:




2) पावसाळ्यात उद्भवलेला प्रसंग
मुद्दे:- ऋतुचक्र – निसर्गाचे दृश्य – पावसाचे विद्रूप दर्शन / उद्भवलेला प्रसंग – मदतीचा हात – शिकवण.